

बकरी ईद सणाचे महत्व लक्षात घेऊन प्रशासनास सहकार्य करावे

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | शनिवार दिनांक 31/05/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 120 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य तरुण पिढीला माहिती व्हावे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मत; 'भाजयुमो'तर्फे अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त युवा प्रेरणा संवाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे: "आपल्याला शिकवल्या गेलेल्या इतिहासात मुघल गेल्यावर थेट ब्रिटिश आले आणि राज्य केले असे सांगितले जाते. पण ते चुकीचे आहे. दरम्यानच्या १०० ते १२५ वर्षात वेगवेगळ्या स्वरूपात ठिकठिकाणी राज्यकारभार सुरु होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी २८ वर्ष उत्कृष्ट कारभार चालवला. त्यांच्या कारभारात सामान्य माणूस सर्वप्रथम होता. अहिल्यादेवी महाराणी होत्या. त्यांच्या नावाने राज्यात अनेक योजना सुरू केल्या आहेत. अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य तरुण पिढीला माहिती व्हायला हवे," असे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने 'युवा प्रेरणा संवाद' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमावेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेचे आमदार व महासचिव विक्रांत पाटील, आमदार योगेश टिळेकर, आमदार हेमंत रासने, आमदार शंकर जगताप, भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, भाजपा प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपा युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस सुदर्शन पाटसकर, निखिल चव्हाण, योगेश मेंद, महिला शहराध्यक्ष निवेदिता एकबोटे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष करण मिसाळ, संदीप सातव, सचिन जायभाये, कुणाल टिळक, प्रिया पवार, भैरवी वाघ, अमृत मारणे, कुणाल मराठे,अजित कुलथे, अजिंक्य टेकवडे, ललिता जाधव, संग्राम बर्गे आदी उपस्थित होते. याप्रसंगी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्ताने वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्पर्धेचे बक्षीस वितरण, तसेच समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आज आपण अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने एकत्र आलो.

३०० वर्षांनंतरही त्यांच्या कारभाराची आठवण काढली जाते. कारण देशात होणाऱ्या परकीय आक्रमणांना मोडीत काढण्याचे काम त्यांनी केले. भारतीय समाज एकसंध असून, आध्यात्मिक ताकद प्रबळ आहे. त्यामुळे आपली संस्कृतीची मानके तोडण्याचा, उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न आक्रमणांनी केला. भारतीयाची शक्तिस्थळे, देवस्थाने नष्ट करण्याचे काम त्यांनी सातत्याने केले. अहिल्यादेवी होळकर यांनी संपूर्ण देशातील पुण्यस्थळे आणि शक्तिस्थळे, घाटांचे पुनर्जीवन करण्याचे काम केले.

त्यांच्यामुळेच आज सर्व ज्योतिर्लिंग शाबूत आहेत."

"औरंगजेबासारख्या नालायक लोकांनी आपली मंदिरे उद्ध्वस्त करण्याचे काम केले.

आपल्या संस्कृतीचे पुनर्जीवन करण्यात अहिल्यादेवी यांचा मोठा वाटा आहे. अनेक चांगले उत्कृष्ट जलशास्त्र वापरून जलसंधारणाचे काम त्यांनी केले.

एक कर पद्धत लावून सामान्यांना दिलासा दिला. योग्य दुष्काळ नियोजन केले. राज्यकारभार चालवताना अर्थव्यवस्था मजबूत ठेवण्याचे काम त्यांनी केले. महेश्वरी येथे बाहेरून विणकर आणून नवीन बाजारपेठ निर्माण केली. चांगले आयात-निर्यात धोरण बनवले व राबवले. त्यांनी देशभरात मोठ्या प्रमाणात वैयक्तिक खर्चातून स्थापत्य कामे केली. साधी जीवनशैली त्यांनी अंगिकारली होती," असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

'ऑपरेशन सिंदूर'च्या निमित्ताने केलेल्या कारवाईबाबत दोन महिला माहिती देत होत्या.

या महिलांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्राधान्य दिले. हे अहिल्यादेवी होळकर यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याचे प्रतीक आहे.

आत्मनिर्भर भारताचे महत्व अहिल्यादेवी यांनी त्याकाळात ओळखले होते. शस्त्रनिर्मिती कारखाने त्यांनी तयार केले. त्यांच्या राज्याला कोणी कधी नख लावू शकले नाही. जातीपातीचे राजकारण न करता त्यांनी पारदर्शकपणे कारभार केला.

त्यांची न्यायव्यवस्था व्यक्ती निरपेक्ष होती. कायदा आणि सुव्यस्था राज्य त्यांचे मानले जाते, असेही त्यांनी पुढे नमूद केले.

आमदार विक्रांत पाटील म्हणाले, "१८२५ ते १७९० दरम्यान ७० वर्ष अहिल्यादेवी होळकर यांचा कार्यकाळ आहे. त्यांचे काम तळागाळापर्यंत पोहचवण्यासाठी भाजप काम करत आहे. आधीच्या ६० वर्षात सत्ता उपभोगणाऱ्यांनी अहिल्यादेवी यांचे कार्य समोर आणले नाही. बहुजन समाजासाठी त्यांचे काम प्रेरणादायी आहे.

त्यांचा संघर्ष, कार्यपद्धती घेऊन आम्ही जनतेसमोर जात आहोत. इतिहासात ज्यांनी संघर्ष केला, त्या सर्व महापुरुषांच्या नेतृत्वातून आमचे आजचे नेते काम करत आहेत. अध्यात्मिक भावना जपतानाच समाजाच्या प्रश्नासाठी रणरागिणी होण्याचे कामही व्हायला हवे."

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी संपूर्ण भारतवर्षांत अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, त्याप्रमाणेच त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा, यासाठी औद्योगिक धोरण आखले, अनेक प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला.

यासह त्यांनी अनेक उल्लेखनीय कार्य केलेले आहेत. त्यांचे हे कार्य व आदर्श समाजापर्यंत पोहोचवण्याचा मुख्य उद्देश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे एक व्हिजन घेऊन वाटचाल करत आहेत.

आगामी मनपा निवडणुकीत युवा मोर्चाचा सिंहाचा वाटा असेल, असे मत अनुप मोरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करण मिसाळ यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदिता एकबोटे यांनी केले.

# चऱ्होलीकर भूमिपुत्रांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार!

## प्रस्तावित टीपी स्कीम रद्द केल्यामुळे आनंद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने प्रस्तावित केलेली टीपी स्कीम रद्द करण्याची सूचना प्रशासनाला केली. त्यामुळे प्रशासनाने कार्यवाही स्थगित केली. यामुळे मौजे चऱ्होली येथील ग्रामस्थ, शेतकरी आणि भूमिपुत्रांनी समाधान व्यक्त केले आहे.



दरम्यान, पुण्यात एका कार्यक्रमाच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची चऱ्होलीकरांनी भेट घेतली आणि टीपी स्कीम रद्द करण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतल्याबाबत आभार व्यक्त केले. तसेच, आमदार महेश लांडगे यांनी ग्रामस्थांना दिलेला शब्द खरा केला. भूमिपुत्रांच्या न्याय्य हक्कांसाठी कायम कठोर भूमिका घेतल्याबद्दल आमदार लांडगे यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे.

यावेळी शहराचे माजी महापौर नितीन काळजे, सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी, स्थानिक नागरिक उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे भाजपाच्या सत्ताकाळात समाविष्ट गावांमधून भाजपाचा पहिला महापौर म्हणून मला काम करण्याची संधी मिळाली. प्रशासकीय राजवटीमध्ये आम्हा भूमिपुत्रांवर टीपी स्कीम लादण्याचा प्रयत्न केला जात होता. याबाबत भूमिपुत्रांनी एकजुट केली आणि आंदोलन उभा केले.

दरम्यान, आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी करुन महापालिका प्रशासनाला सूचना करण्यास सांगितले. त्यानुसार, फडणवीस यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना आदेश दिले. त्यांच्या आदेशानुसारच, टीपी स्कीम राबवण्याची कार्यवाही स्थगित करण्यात आली. येत्या महापालिका सभेत त्याबाबतचा प्रस्ताव मंजूर करण्यात येईल आणि त्यानंतर अधिकृत 'नोटिफिकेशन' काढण्यात येणार आहे.

> मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडमधील भूमिपुत्रांच्या हितासाठी कायम प्राधान्य देण्यात आले आहे. त्यांच्या सूचनेनुसारच, महानगरपालिका प्रशासानाने मौजे चिखली आणि मौजे चऱ्होली येथील प्रस्तावित TP स्कीम रद्द केली. गुरूवारी महापालिका भवन येथे बैठक झाली. त्यावेळी प्रशासनाने घोषणा केली. त्यानंतर आज मुख्यमंत्री पुण्यात आले होते. त्याठिकाणी चऱ्होलीच्या भूमिपुत्रांसोबत त्यांची भेट घेतली आणि आभार व्यक्त केले.
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# पीसीयू च्या वतीने श्री ठाणेदार यांचा 'लिव्हिंग लिजंड ऑनर' पुरस्कार देऊन गौरव

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे भारतीय तरुणांनी आता परदेशात जाण्याची गरज नाही. भारतात आता उद्योग, व्यवसायाच्या मुबलक संधी उपलब्ध आहेत. त्याचा फायदा घेऊन आपण उद्योग, व्यवसायात पुढे गेले पाहिजे असे मार्गदर्शन अमेरिकेतील एकमेव मराठी खासदार श्री ठाणेदार यांनी पुण्यात केले. गुरुवारी (दि.२९) पुण्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे (पीसीईटी) पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) आणि महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ, गर्जे मराठी ग्लोबल आणि रुरल आंत्रप्रिन्युअर कनेक्ट इनिशिएटिव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात श्री ठाणेदार बोलत होते. यावेळी श्री ठाणेदार यांना महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष सचिन ईटकर यांच्या हस्ते 'लिव्हिंग लिजंड ऑनर' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड विद्यापीठ व्यवस्थापन समिती सदस्य नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष




सचिन ईटकर, कॉमसेन्स टेक्नॉलॉजीज्‌चे अध्यक्ष सागर बाबर, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, माधव दाबके आदी उपस्थित होते. अमेरिकेच्या संसदेतील एकमेव मराठी खासदार, एक यशस्वी उद्योजक व 'ही श्रींची इच्छा' या गाजलेल्या आत्मचरित्राचे लेखक म्हणून श्री ठाणेदार यांना ओळखले जाते. सध्या ते मिशिगनच्या १३ व्या कॉंग्रेसनल जिल्ह्यातून प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. सत्काराला उत्तर देताना श्री ठाणेदार म्हणाले की, माझी आई आणि अब्राहिम लिंकन हे माझे आदर्श आहेत. त्यामुळे नोकरी उद्योग, व्यवसायातील अनेक अपयशांचा सामना करून पुन्हा उभा राहिलो. मंदीच्या काळात संपूर्ण व्यवसाय बुडाल्यावर मी खचून गेलो नाही. आधीच्या चुका परत करायच्या नाहीत, एवढे शिकलो आणि नव्याने व्यवसाय उभारले.

एका टप्प्यावर मला भौतिक यशाचे आकर्षण वाटेनासे झाले आणि मी समाजसेवा करण्याच्या हेतूने राजकीय क्षेत्रात प्रवेश केला, निवडणूक लढवली. तिथेही सुरवातीला अपयश आले. पण मी प्रयत्न सोडले नाहीत. तयारी करून पुन्हा प्रयत्न केल्यावर यशस्वी ठरलो आणि आता खासदार या भूमिकेतून लोकांसाठी काम करण्याचे समाधान अनुभवत आहे. तरुणाईने स्वतःवर सदैव विश्वास ठेवून, पुन्हा पुन्हा प्रयत्न केले पाहिजेत. अपयशाने खचून न जाता, पुन्हा उभे राहिले पाहिजे असा सल्ला ठाणेदार यांनी तरुणांना दिला. उद्योग, व्यवसाय आणि भारत अमेरिका यांच्यातील सध्याच्या संबंधातील काही मुद्द्यांवरही ठाणेदार यांनी मत व्यक्त केले. आता परदेशात जाण्याची गरज नाही भारतातच अनेक संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. मी जेव्हा अमेरिकेत आलो, तो काळ खूप वेगळा होता.आताचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे इमिग्रेशन धोरण हे विवादास्पद आणि अमेरिकेला मागे नेणारे आहे. त्याला सर्व स्तरातून विरोध होत आहे. अमेरिकेतील बहुतांश तंत्रउद्योग बाहेरील कुशल मनुष्यबळावर अवलंबून आहेत.

त्यामुळे ट्रम्प यांच्या धोरणाला देशातूनही विरोध आहे असेही श्री ठाणेदार यांनी सांगितले.सचिन ईटकर म्हणाले की, ठाणेदार यांचे जीवन म्हणजे तरुणाई साठी प्रेरणा आहे. संघर्ष या संज्ञेला त्यांनी जणू अर्थ दिला आहे. आव्हाने आणि धाडस, यांचे दुसरे नाव म्हणजे ठाणेदार असे म्हणावे लागेल.

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, युवकांनी हीरो आणि आयडॉल यांच्यातील फरक समजून घेतला पाहिजे. ठाणेदार यांच्यासारख्यांची चरित्रे युवकांसमोर असली पाहिजे. त्यासाठी साहित्य महामंडळाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील. यावेळी 'आत्मनिर्भर भारत' या उपक्रमाअंतर्गत संरक्षण सामग्री उत्पादन क्षेत्रासाठी योगदान देणारे उद्योजक गणेश निभे यांचाही सत्कार श्री ठाणेदार यांच्या हस्ते करण्यात आला.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीयूचे उप कुलगुरू डॉ. गोविंद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले आणि माधव दाबके यांनी आभार मानले.

# बकरी ईद सणाचे महत्व लक्षात घेऊन प्रशासनास सहकार्य करावे -आयुक्त शेखर सिंह

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी, बकरी ईदच्या अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे सर्व संबधित विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी समन्वय साधून पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले. बकरी ईद सणाचे महत्व लक्षात घेऊन नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि शहरातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत पिंपरी येथील महापालिका मुख्य कार्यालयातील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहामध्ये आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता देवण्णा गट्टूवार, अजय सूर्यवंशी, नितीन देशमुख, उप आयुक्त संदिप खोत, सचिन पवार, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण दगडे, कार्यकारी अभियंता हरविंदर बन्सल, प्रेरणा सीनकर, सुनीलदत्त नरोटे, बी.पी. लांडे आदी उपस्थित होते. तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन हिरे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक अशोक कडलग, गणेश जामदार कुरेशी संघटनेचे रफिक कुरेशी, गफूर कुरेशी, युसुफ कुरेशी,वाहिद कुरेशी, हमीद कुरेशी, मुबीन शाबीर कुरेशी, शादाब फैय्याज कुरेशी, शकील कुरेशी यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महापालिकेने तयार केलेल्या तात्पुरत्या स्वरूपातील कुर्बानीच्या ठिकाणी पुरेशा पाण्याचा पुरवठा, पुरेसे मनुष्यबळ नेमणूक तसेच वेस्ट उचलण्यासाठी आवश्यक यंत्रणा, स्वच्छता या सर्व बाबीचे व्यवस्थिपणे नियोजन करण्याचे निर्देश आयुक्त सिंह यांनी संबधित विभागांना दिले. तर शासनाने दिलेल्या नियमांचे पालन करावे असे पोलीस प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

बकरी ईदसाठी महापालिकेच्या वतीने तात्पुरत्या स्वरूपातील पत्राशेड आणि मंडप उभारण्यात येणार आहे. कुर्बानीच्या ठिकाणी आवश्यक साहित्य, मोबाईल टॉयलेट व्हॅन इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच बकरी ईद निमित्त कुर्बानीसाठी आणण्यात आलेल्या जनावरांना ठेवण्यासाठी पुरेशा जागेची तसेच पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. बकरी ईदसाठी आवश्यक पाणी पुरवठ्यासाठी टँकर आणि स्वतंत्र हौद असतील. कुर्बानीनंतर निर्माण होणारे वेस्ट तात्काळ उचलण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि यंत्रणांची व्यवस्था करण्यात येणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीनेही सर्व व्यवस्था करण्यात आली असून आवश्यक पोलीस यंत्रणा देखील याठिकाणी असणार आहे. कुर्बानी साठी नेहरू नगर डॉक पॉइंट येथील जागा निश्चित करण्यात आली आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी यावेळी दिली.

पाण्याचा पुरवठा अधिक प्रमाणात करण्यात यावा, गुरे बांधण्यासाठी अधिकची जागा उपलब्ध करून द्यावी, मंडपाच्या किंवा पत्राशेडच्या ठिकाणी स्वच्छता ठेवण्यात यावी आदी मागण्या यावेळी बैठकीत उपस्थित संघटनांच्या प्रतिनिधींच्या वतीने करण्यात आल्या.

# चोरी झालेले 40 लाखांचे 137 मोबाईल मूळ मालकांना परत

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड: वाकड पोलिसांनी गहाळ आणि चोरी झालेले ४० लाखांचे १३७ मोबाईल मूळ मालकांना परत केले आहेत. वाकड पोलीस ठाण्याच्या हद्दीतून गहाळ आणि चोरी झालेले मोबाईल तंत्रज्ञानाचा वापर करून संबंधित व्यक्तींना कायद्याचा धाक दाखवून परत मिळवले आहेत. ही कामगिरी वाकड पोलिसांनी केली आहे. पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांच्या हस्ते मूळ मालकांना मोबाईल परत देण्यात आले. एकदा गहाळ आणि चोरी गेलेला मोबाईल परत मिळणं अवघडच आहे. पण, पोलिसांनी मनावर घेतल्यास अशा पद्धतीने ही मोबाईल मिळू शकतात हे त्याचं उदाहरण आहे. अनेकदा बाजारात, शतपावली करत असताना, बस प्रवास करत असताना, गर्दीच्या ठिकाणी चोरटे संधी साधून मोबाईल लंपास करतात. कधी स्वतः कडून मोबाईल गहाळ होतो. अशा वेळी केवळ आपण पोलिसात तक्रार देऊ शकतो.वाकड पोलिसांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून मोबाईल ट्रेस केले. १३७ पैकी अनेक मोबाईल हे






कर्नाटक, राजस्थान, गुजरात, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश ट्रेस झाले. संबंधित व्यक्तीशी पोलिसांनी संपर्क करून कायद्याचा धाक दाखवून त्या-त्या राज्यात जाऊन हे मोबाईल जप्त केले आहेत. काहींनी हे मोबाईल कुरिअर देखील केले आहेत. वाकड पोलिसांनी १३७ मोबाईल मूळ मालकांना परत केल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 31/05/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# जारण'च्या प्रमोशनल साँगने उडवला थरकाप

## गाण्यामध्ये झळकल्या सोनाली कुलकर्णी आणि भार्गवी चिरमुले




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मराठी चित्रपटसृष्टीत सध्या चर्चेत असलेला 'जारण' हा आगामी चित्रपट प्रेक्षकांच्या उत्सुकतेचा केंद्रबिंदू ठरत आहे. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचा थरारक ट्रेलर प्रदर्शित झाला. ट्रेलर प्रेक्षकांचे मन जिंकत असतानाच आता या चित्रपटातील प्रमोशनल साँग प्रेक्षकांच्या भेटीला आले आहे. सोनाली कुलकर्णी आणि भार्गवी चिरमुले यांच्यावर चित्रित करण्यात आलेल्या या भयावह गाण्याला अमृता सुभाष, सिंधुजा श्रीनिवासन, मनीषा पांडरांकी, लक्ष्मी मेघना यांचा आवाज लाभला असून वैभव देशमुख यांच्या शब्दांनी या गाण्यात अधिकच रंगत आणली आहे. तर ए व्ही प्रफुल्लचंद्र यांच्या संगीताने या गाण्यातून चित्रपटाबद्दलची गूढता अधिकच वाढवली आहे. त्यांच्या अफलातून संगीताने हे गाणे एका वेगळ्याच उंचीवर नेले आहे.

'जारण'च्या पोस्टरपासूनच प्रेक्षकांच्या मनात या चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण झाली होती. त्यात टिझर आणि ट्रेलरने या उत्सुकतेत अधिकच भर टाकली. 'जारण'चा ट्रेलर प्रचंड लोकप्रिय होत असून त्याला अनेक सकारात्मक प्रतिक्रियाही येत आहेत. भय, अंधश्रद्धा आणि वास्तव यांचा अनोखा संगम अनुभवण्यासाठी प्रेक्षक आतूर आहेत. त्यात आता या प्रमोशनल साँगने उत्कंठा वाढवली आहे.

सोनाली आणि भार्गवीने आपल्या प्रभावी अभिनयातून या गाण्यात एक रहस्यमय आणि भीतीदायक वातावरण निर्माण केले आहे. गाण्याचा मूड संपूर्णतः भयावह, गूढतेने भरलेला असून, त्यातील संगीत, पार्श्वभूमी आणि दिग्दर्शन प्रेक्षकांच्या मनात थरकाप निर्माण करणारे आहे. गाण्याच्या माध्यमातून चित्रपटाची संकल्पना अधिकच स्पष्ट होत असून कथानकातील अस्वस्थ करणारी आणि विचारप्रवृत्त करणारी बाजू यानिमित्ताने प्रेक्षकांसमोर येत आहे.

निर्माते अमोल भगत म्हणतात, " या गाण्यातून आम्ही 'जारण'ची भीतीदायक आणि सोबतच भावनिक बाजू मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

संगीत, गायन आणि व्हिज्युअल्स यांचे जबरदस्त मिश्रण प्रेक्षकांच्या अंगावर शहारे आणणारे आहे.

चित्रपटाचा मूड आणि आशय या एका गाण्यातून प्रभावीपणे व्यक्त होत आहे.

या गाण्याची खास बाब म्हणजे सोनाली कुलकर्णी व भार्गवी चिरमुले या गाण्यात पाहायला मिळत आहेत. या दोघी उत्कृष्ट अभिनेत्री तर आहेतच याव्यतिरिक्त त्या माझ्या चांगल्या मैत्रिणी आहेत. त्यामुळे मैत्रीखातर त्यांनी या प्रमोशनल गाण्यात सहभाग घेऊन मला व चित्रपटाच्या पूर्ण टीमला सहकार्य केले."

संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र म्हणतात, " 'जारण'चे प्रमोशनल साँग तयार करताना चित्रपटाचा मूड लक्षात घेऊनच हे गाणे करायचे होते. चित्रपटाची संकल्पना कुठेही विस्कळीत होणार नाही याची काळजी घ्यायची होती.

त्यामुळे हे जरा आव्हानात्मक होते. प्रत्येक मूड, ताल, आवाज यांच्याकडे आम्ही विशेष लक्ष दिले. अर्थात हे सगळे गायक, गीतकार यांच्या साथीनेच झाले. हे गाणे कमाल बनले असून प्रेक्षकांना ते नक्की भावेल."

या चित्रपटाचा भाग झाल्याबद्दल सोनाली कुलकर्णी म्हणते, "माझ्यासाठी हा अनपेक्षित अनुभव होता. काय गाणे असेल, आपण कोणत्या झोनमध्ये जाणार आहोत, याची मला काहीच कल्पना नव्हती. त्यामुळे माझ्यासाठी हा सुखद धक्का होता. या प्रमोशनल साँगचा झोन खूप वेगळा आहे. गाण्याचे बोल अहिराणी भाषेत असल्याने शब्द सहज कळत नाहीत.

त्यामुळे ते जाणून घेण्याची उत्सुकता वाढते. ते सतत लूपमध्ये ऐकत राहावसे वाटते. अतिशय भन्नाट गाणे आहे. मला खूप आनंद आहे, या चित्रपटाची जोडले गेले आहे. अमोल भगत माझ्या कुटुंबाचा एक भाग आहे. त्याच्या पहिल्याच चित्रपटाची निर्मिती करतोय, तर त्याच्या चित्रपटात आपले काहीतरी योगदान असले पाहिजे, असे मनात होतेच आणि ही संधी समोरून चालून आली.

त्यामुळे मी त्याला त्वरीत होकार दिला.

त्यात हे गाणे मला स्वत:ला खूप आवडल्याने ते करतानाही मजा आली. कोरिओग्राफी खूप कमाल आहे. सगळेच अप्रतिम आहे. शिवाय सोबत भार्गवी आहे. खूप वर्षांनी एकत्र काम करत आहोत. आवडती माणसं असल्याने काम करताना खूप मजा आली."

भार्गवी चिरमुले आपल्या अनुभवाबद्दल म्हणते, " माझ्यासाठी हा खूप वेगळा आणि छान अनुभव आहे. एकतर कधीही न साकारलेली भूमिका मी केली आहे. चित्रपटाविषयी मी ऐकून होते आणि सगळ्यांसारखीच उत्सुकता मलाही होती. गाण्याचे बोल, संगीत, चित्रीकरण सगळेच अप्रतिम आहे. जबरदस्त कथा, अभिनय यांचा अनुभव प्रेक्षकांना चित्रपटगृहात येईलच. परंतु या प्रमोशनल साँगचा भाग झाल्याचा माझा अनुभव खूपच छान होता. यासाठी अमोलच मनापासून आभार."

अनिस बाझमी प्रॉडक्शन्स प्रस्तुत, ए अँड एन सिनेमाज, एलएलपी यांच्या सहयोगाने आणि ए३ इव्हेंट्स अँड मिडिया सर्व्हिस निर्मित 'जारण' चित्रपट येत्या ६ जून २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन हृषीकेश गुप्ते यांनी केले असून अमोल भगत आणि नितीन भालचंद्र कुलकर्णी यांनी निर्मितीची धुरा सांभाळली आहे.

तर मनन दानिया सहनिर्माते आहेत. चित्रपटात अभिनेत्री अमृता सुभाष व अनिता दाते यांच्या प्रमुख भूमिका असून किशोर कदम, ज्योती माळशे, विक्रम गायकवाड, राजन भिसे, अवनी जोशी, सीमा देशमुख यांचाही दमदार अभिनय पाहायला मिळणार आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 31/05/2025

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरी चिंचवडच्या सेवेतून 88 जण सेवानिवृत्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**सेवे एक सह नियंत्रण, आठ मुख्याध्यापक, दोन सह शहर अभियंता, एक प्रशासक, चार सिस्टर इनर्ज, एक कार्यान्वित अभियंता, एक अधिकारी, तीन अधिकारी, अधिकारी, वाहन चालक, सोळा मजूर, दहा क्लास अशा अधिकाराचा सेवानिवृत्तांचा समावेश.**






प्राप्त, दि. ३१ मे २०२५ :- सत्ता सेवेतून निवृत्त अधिकारी, दक्षिणी आपल्या आरोग्याची काळजी, निरोगी आणि आनंदी आपले जीवन जगावे तसेच कुटुंबीयांना वेळ द्या. याशिवाय एकमेकांसोबत राहून पर्यटनासारखे निवडून आलेले छंद जोपासावेत असे मत अतिरिक्त विजयकुमार खोरा यांनी व्यक्त केले आणि सेवानिवृत्त व्यापाऱ्यांना त्यांच्या पुढील आनंदी आणि आरोग्यदायी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षा येथे माहे मे २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त ८२ तर उत्तमे निव्वळ ६८ अशा एकूण ८८ प्रमुख विजयकुमार खोराटे आणि तृप्ती सांडभोर यांच्या लाभार्थी येथे सत्कार करण्यात आला. सर्व मार्गदर्शन करताना विजयकुमार खोराटे बोलत होते.

या कार्यक्रमास शहर अभियंता मकरंद निकम, उप उदय मनोज लोणकर, संच खोत, राजेश आगळे, मुख्य सुरक्षा अधिकारी जरांडे, विशेष अधिकारी कि गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, लेखाधिकारी चारूशिला जोशी, कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे तसेच अभिमान भोसले, मनोज माचरे आणि कर्मचारी कर्मचा-यांचे उपस्थित होते.

माहे मे २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त- या आर्थिक वृत्तात सहचंद्रकांत इं, सह शहर अभियंता संजय खाबडे, विजयकुमार श्रीकांत कोळप, कार्यकारी अभियंता दिली धुमाळ, प्रशासक अधिकारी संजीव भांगले, मुख्य राजाराम भागवत, ज्योती चिपाडे, शाहिदा सय्यद, सुरेखा भालचीम, सारिका कानडे, सुनिता घुले, अरुणा महानवर, खुल्ला पर्यवेक्षक अनिता के, सुरक्षा निरीक्षक बापू लिम्हण, प्रमुख अग्निशमन विमोचक संजेश ठाकूर, आरोग्य निरीक्षक अशोक राठोड, मल्हारी काळे, कार्यलय अधीक्षक वंदना ठाकरे, रवींद्र पाटील इन्चार्ज सुवर्णा ताठे, वंदना बांगर, ललिता पोखरकर, शारदा पुंडे, लेखपाल उषा थोरात, मुख्य लिपिक गंगाधर थोरात, कनिष्ठ अभियंता अग्रू घेरडे, उपशिक्षक मानसिंग जायपत्रे, उपशिक्षक सविता सदस्य, सबाई पाटील गाडानिर्देशक, भारती पवार, दिलीप थोरे, लाला, प्रकाश हिंडे घोडके, अग्निशमन विमोचक अशोक पिंपरे, असिस्ट मेट्रेन पंचशिला कांबळे, लॅब टेक्निशियन कैलास खागे, प्रीमॅथर असिस्टंट अजोड घोणे, वायरमन हिरचंद जगताप, बाळासाहेब साळवे, चालक देवदास अस्वर, शंकर खुडे, बालाजी अय्यंगार, शंकर खुडे, बालाजी अय्यंगार, सुनील जगताप जवाहरल सुंदेचा, रखदार रवींद्राचा, देवजी भांगे कैलास येलवंडे, पोपट गावडे, मुकादम आनंद भगत, सुनील गायकवाड, आशा जाधव, अविनाश वाघेरे, शिवा सुभाष भुजबळ, गुलाब गुजर, अशोक लांडे, तिकोणे, गोपाल काभो, आणि चौधरी, अशोक ढेले, शत्तर, पंडितकर, शंकर शिर्के कालूराम कुदळे रमेश मोरे, प्रीतम धनानी, बाळू फुगे, प्रभाकर पाडाळे, लक्ष्मणकला, विश्वनाथ लांडगे, सफाईदार देवमाबाई, दिग्गज पोळपघट, लता थेंडे, अब्दुल रज्जू मेणे दिग्गज पोळपघट, लता थेंडे, अब्दुल रज्जा कोरबू, नंदा खुडे, पांडुरळ, तुडे, शशिजाळे, गटकुली दिलीप पाचारणे समाविष्ट आहे.

तर स्वेछानि भक्ती घेवढी स्वच्छता उपशिक्षक गीता कोडकणी, मुकाद शीला मोरे, स्वच्छी संगीता बनसोडे नेटके, गटरकुली विठ्ठल शेलुकर, प्रभाकर नवरे यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे आभार आणि उपस्थितांचे आभार प्रफुल्ल पुराणिक सूत्रस यांनी केले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968